# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.09.2025** **वारःमंगळवार**

---

1.पुण्यातील वाहतुक कोंडीच्या दृष्टीनं महत्वाच्या पुलाचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

2.मराठा आरक्षणावर कायदेशीर मार्ग काढण्याचं काम सुरु असल्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

3.इथेनॉल-मिश्रित इंधनाला विरोध करणारी याचिका रद्दबातल

4.पर्यावरण-पूरक गणेश उत्सवाला राज्यात पाठिंबा

आणि

5.विश्व बॅडमिंटन स्पर्धा पुढील वर्षी दिल्लीमध्ये होणार

**उड्डाणपुल**

पुणे शहरातील वाढत्या वाहनसंख्येमुळं निर्माण होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी सिंहगड रस्त्यावर उभारण्यात आलेला उड्डाणपूल नागरिकांच्या सेवेत दाखल झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दुसऱ्या टप्प्याचं काल लोकार्पण करण्यात येऊन हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. तीन टप्प्यातला सुमारे अडीच किलोमीटर लांबीचा हा पूल पुण्यातील सर्वात लांब पूल आहे. सिंहगड रस्त्यावरून धायरी, नऱ्हे, खडकवासला, वडगाव बुद्रुक, नांदेड सिटी तसंच बेंगळुरू-मुंबई राष्ट्रीय महामार्गावर दररोज लाखो वाहनांची वाहतूक होत असते. या मार्गाच्या एका बाजूला मुठा नदी आणि दुसऱ्या बाजूस डोंगर असल्याने पर्यायी रस्ता शक्य नव्हता.

पुणे मेट्रोच्या छत्रपती संभाजी उद्यान मेट्रो स्थानक ते शनिवार पेठ यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. या पादचारी पुलाची रचना अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून हा स्थापत्यकलेचा उत्तम नमुना आहे. या दोन्ही पुलांच्या उपयुक्ततेविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

**<u>आरक्षण-पुणे</u>**

राज्य सरकार मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखालील मराठा आरक्षण आंदोलनावर मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करेल, आरक्षण मागणी न्यायालयात टिकेल अशा पद्धतीनं सोडवण्यासाठी सरकार कायदेशीर पर्यायांचा शोध घेत आहे असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात बातमीदारांशी बोलताना सांगितलं. जरांगे आणि त्यांच्या समर्थकांनी प्रथमदर्शनी निषेध करण्यासाठी, परवानगी दिलेल्या अटींचं उल्लंघन केल्याचं उच्च न्यायालयानं नमूद केल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासोबत झालेल्या बैठकीत कायदेशीर उपायांवर चर्चा करण्यात आल्याचं ते म्हणाले...

दरम्यान, मराठा आरक्षण आंदोलनामुळं दक्षिण मुंबईतील वाहतूक विस्कळीत झाली असून मुंबईतले रस्ते आजअखेर मोकळे करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं आंदोलकांना दिले आहेत.

**<u>सन्या</u>**

वीस टक्के इथेनॉल-मिश्रित पेट्रोलच्या, देशभरात अंमलबजावणीला आव्हान देणारी जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयानं काल फेटाळून लावली. लाखो वाहन मालकांना, त्यांच्या वाहनांसाठी डिझाइन केलेलं नाही, असं इंधन वापरण्यास भाग पाडलं जात असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला होता. केंद्र सरकारनं याचिकेला विरोध करताना सांगितलं की E20 इंधन पर्यावरण तसंच ऊस उत्पादक शेतकऱ्यांना लाभदायक आहे.

**<u>जितेंद्र-जैव अर्थव्यवस्था</u>**

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी, जैवतंत्रज्ञान, देशातील प्रत्येक क्षेत्रात पोहोचलं असल्याचं काल नवी दिल्लीत सांगितलं. अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि रोजगारासाठी जैवतंत्रज्ञानाच्या धोरणाला एक वर्ष झाल्यानिमित्त आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. देशातील जैव अर्थव्यवस्था २०१४ मध्ये दहा अब्ज डॉलर्सची होती, ती २०२४ मध्ये १६५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<u>पोस्ट पेमेंट बँक स्थापना</u>**

इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेनं स्थापनेपासून गेल्या आठ वर्षांमध्ये १२ कोटींहून अधिक ग्राहक जोडले आहेत, अब्जावधी डिजिटल व्यवहारांवर प्रक्रिया केली आहे आणि देशभरात घरपोच बँकिंग सेवा सक्षम केल्या असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. दळणवळण मंत्रालयानं काल एका निवेदनात सांगितलं की, १ लाख ६४ हजारांपेक्षा जास्त टपाल कार्यालयं आणि १ लाख ९० हजारांपेक्षा अधिक पोस्टमन आणि ग्रामीण डाक सेवक यांच्या अतुलनीय संपर्काचा लाभ

यासाठी होत आहे. भारतातील सामान्य माणसासाठी सर्वात सुलभ, परवडणारी आणि विश्वासार्ह बँक म्हणून इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेची 2018 मध्ये सुरुवात करण्यात आली.

**<u>गणपती</u>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांना काल भेट देऊन दर्शन घेतलं आणि आरती केली. यावेळी फडणवीस यांचा विविध मंडळांच्या वतीनं सत्कार करण्यात आला. सर्वांच्या मनोकामना पूर्ण व्हाव्यात. सर्वांना सुबुद्धी देवो, सन्मार्गानं चालण्याची प्रेरणा देवो, अशी प्रार्थना त्यांनी श्री गणेशाकडे केली.

सातारा जिल्ह्यात पर्यावरण संवर्धन आणि जलसंपदा रक्षणाचा संदेश देत जिल्हा प्रशासनानं पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी व्यापक नियोजन केलं आहे. ग्राम पंचायतींमध्ये नैसर्गिक तळी आणि जुन्या पडक्या विहिरी, तसंच विसर्जन कुंडांची निर्मिती करण्यात आली आहे. मूर्ती विसर्जनानंतर त्या कुंभारांकडे सुपूर्द करण्याची व्यवस्था करताना 221 ग्रामपंचायतींनी कुंभारांची यादी तयार केली आहे. निर्माल्याचं व्यवस्थापन करण्यासाठी ट्रॅक्टर, घंटागाड्या आणि कचरा पेट्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संकलित निर्माल्यापासून जैविक खत निर्मितीची प्रक्रिया अनेक ग्रामपंचायतींमध्ये राबवली जाणार आहे.

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे शहरात मूर्ती विसर्जनाच्या सोयीच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या कृत्रिम कुंड आणि फिरत्या विसर्जन कुंडात कालअखेर अंदाजे तीन हजार मूर्तींचं विसर्जन करण्यात आलं. मागील वर्षी पीओपीच्या मुर्तींचा वापर न करून नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य केलं होतं. यंदाही असंच सहकार्य करण्याचं आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

गणपतीच्या आगमनानंतर आलेल्या गौरींचं काल अहिल्यानगर जिल्ह्यात पूजन करण्यात आलं. सकाळी थालिपीठाचा नैवेद्य आणि सायंकाळी पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्यात आला. घरोघरी गौरीसमोर सजावट करण्यात आली होती. गौरींचं आज विसर्जन होणार आहे.

सोलापूर जिल्हा अन्न आणि औषध प्रशासनानं गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर भेसळयुक्त अन्नपदार्थ विक्रेत्यांवर धाडी घालून कारवाई केली.

ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, कलावंत आणि निर्माते राज कपूर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पुणे फेस्टिवलमध्ये काल ‘आवारा हूँ’ हा गायन, नृत्य आणि संगीताचा भव्य प्रयोग करण्यात आला. तो पाहण्यासाठी प्रेक्षकांनी प्रचंड गर्दी केली होती.

**<u>बरखास्त</u>**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाची मुदत संपल्यानं शासनानं हे मंडळ बरखास्त करुन पणन संचालक विकास रसाळ यांची प्रशासकपदी नियुक्ती केली आहे. त्यांनी काल आपल्या पदाची सूत्रं हाती घेतली.

**<u>गेटवेऑफइंडिया</u>**

मुंबईत गेट वे ऑफ इंडियाजवळ जेट्टीचं बांधकाम करण्याच्या विरोधात दाखल झालेली याचिका काल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली. मुंबई उच्च न्यायालयाने 15 जुलैला दिलेल्या आदेशात या जेट्टीच्या कामाला सशर्त परवानगी दिली होती. या आदेशविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेविरुद्धच्या सुनावणीत सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

**<u>योगासन</u>**

राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत धाराशिव जिल्ह्यानं 2 सुवर्ण आणि 1 कास्यपदक पटकावलं.

महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन आणि बृहन महाराष्ट्र योग परिषद यांच्या अधिपत्याखाली घेण्यात आलेल्या वरिष्ठ गटातील स्पर्धेत धाराशिव जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशनच्या योगपटूंनी ही कामगिरी केली.

**<u>वेदिक</u>**

विक्रमादित्य वेदिक घड्याळ आणि त्याच्या मोबाईल ॲप्लिकेशनचं उद्घाटन काल मध्यप्रदेशची राजधानी भोपाळमध्ये करण्यात आलं. पारंपरिक भारतीय दिनदर्शिका या आधुनिक माध्यमातून 189 भाषांमध्ये पाहता येणार आहे. त्यामध्ये वेळेसोबत पंचांग, दिनांक, नक्षत्र, योग, दिवस, महिना, व्रत आणि उत्सवांची माहिती असेल.

**<u>पाऊस</u>**

अकोला जिल्ह्यात २८ ऑगस्टला चार महसूल मंडळाच्या परिसरात अतिवृष्टीची नोंद करण्यात आली. त्यामध्ये पिकांचं प्रचंड नुकसान झाल्यानं शेतकरी हवालदिल झाला आहे. जिल्ह्यात अनेक घरांची पडझड झाली असून नदी आणि नाल्याना पूर आल्यानं जनजीवन विस्कळीत झालं.

**<u>बॅडमिंटन</u>**

पुढील वर्षी ऑगस्टमध्ये बॅडमिंटन विश्व स्पर्धेचं नवी दिल्लीत आयोजन करण्यात येणार आहे. पॅरिसमध्ये यावर्षीच्या स्पर्धेच्या समारोप समारंभात बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशननं ही घोषणा केली. म्हणजे सतरा वर्षांनंतर ही स्पर्धा पुन्हा भारतात भरणार आहे. जागतिक बॅडमिंटन नकाशावर एक प्रमुख ठिकाण म्हणून भारताचं स्थान यातून अधोरेखित होणार आहे.

**<u>हवामान</u>**

मराठवाड्यात वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्राचा घाटमाथा आणि कोकणातही मुसळधार पावसाची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**